# भारत सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेच्या अंमलबजावणीचे चिकित्सक अध्ययन विशेष संदर्भ - नागपूर जिल्हा

**कु. देवल सुरेशराव मडघे (अढाऊ)**
संशोधक विद्यार्थिनी
बी.ए.,बी.एड., एम.ए. (राज्यशास्त्र)

---

**सारांश :**

*भारत सरकार मार्फत महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. लिंगभावनिगडित व्यवस्था दूर करणे हे शासनाचे उदिष्ट आहे. महिलांना शिक्षित करणे, सक्षम करणे करणे आणि स्वयंपूर्ण बनविण्याचा या योजनांचा महत्वपूर्ण उद्देश आहे. शिक्षण हे समाजाच्या सक्षमीकरणाची आणि प्रगतीची आधारशिला आहे आणि लोकसंख्येच्या सर्व घटकांना शैक्षणिक संधीमध्ये समान प्रवेश मिळावा हे सुनिश्चित करणे महत्वाचे आहे. भारतासारख्या विविध सांस्कृतिक, सामाजिक आणि आर्थिक परिदृश्य असलेल्या असलेल्या देशात घटनात्मक तरतुदी तेथील नागरिकांच्या शैक्षणिक अधिकारांचे रक्षण करण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका बजावतात.*

*स्त्री-पुरुष समानतेचे तत्व भारतीय संविधानात प्रस्तावना, मूलभूत अधिकार मुलभूत कर्तव्ये आणि मार्गदर्शक तत्वांमध्ये अंतर्भूत आहे. भारतीय संविधानाने केवळ महिलांना समानताच दिली नाही तर महिलांच्या बाजूने सकारात्मक भेदभावाचे उपाय अवलंबण्याचे अधिकारसुद्धा राज राज्याला दिलेले आहेत.*

*भारतामध्ये महिलांसाठी अनेक सरकारी योजना आहेत. ज्या महिलांच्या आर्थिक, सामाजिक आणि शैक्षणिक विकासासाठी मदत करतात. भारत सरकारच्या 'बेटी बचाओ, बेटी पढ़ाओ' योजनेच्या उद्देश मुलींचे सरंक्षण आणि शिक्षणास प्रोत्साहन देणे आहे.*

*'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या योजनेची सुरुवात 22 जानेवारी २०१५ रोजी पंतप्रधानांनी केली. याअंतर्गत देशातील १०० जिल्हयाची निवड केली आहे. मुलीचे प्रमाण कमी असलेल्या महाराष्ट्र राज्यातील १० जिल्हयाचा यात समावेश आहे. यामध्ये औरंगाबाद, बीड, उस्मानाबाद, जालना, जळगाव, अहमदनगर बुलढाणा, वाशिम, कोल्हापूर आणि सांगली या जिल्हांचा समावेश केलेला आहे. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या योजनेचा मुख्य उद्देश मुलींचा जन्मोत्सव साजरा करणे. आणि शिक्षणाद्वारे त्यांना सक्षम बनविणे तसेच लिंग तपासणीवर प्रतिबंध आणणे, मुलीचा जन्म आणि तिचे जगणे सुरक्षित करणे हा आहे.*

**बीज शब्द :** सक्षमीकरण, लिंगभावनिगडित, स्वयंपूर्ण, आधारशिला, परिदृश्य.

---

**गृहितक :**

केंद्र सरकारची 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजना महिलांच्या शैक्षणिक, सामाजिक प्रशासकीय

सक्षमिकरणास सहाय्यक आहे.

**प्रस्तावना :**

**पूर्व वैदिक काळ :**

भारतीय वैदिक साहित्य आणि इतिहास से संशोधन संबोधनाच्या आधारे असे दिसते की पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. परंतु त्या काळी पितृप्रधान समाजव्यवस्था होती आणि आजही ती तशीच आहे. पूर्व वैदिक काळातील स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची मुभा होती. स्त्रीयांना वेद आणि वेदांच्या स्पष्टीकरणाशी निगडित असलेली वेदांगे या दोन्हीचे शिक्षण दिले जात असे. नंतर मात्र स्त्रियांचे शिक्षण फक्त धार्मिक स्तवने आणि कविता यांच्यापुरते मर्यादित झाले. तत्कालीन समाजामध्ये स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी द्वाणि अर्थोत्पादक समजली जात होती. उत्तर वैदिक काळात जातिव्यवस्था पुरोहित वर्गाचे वर्चस्व समाजामध्ये खोलवर रुजले आणि या घडामोडीमध्ये स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेल्यामुळे त्यांचा गुरुकुलात राहून शिकण्याचा अधिकारही संपुष्टात आला. यावरून असे लक्षात येते की पूर्व वैदिक काळात सामाजिक व शैक्षणिक हक्काच्या दृष्टीने स्त्रियांचे स्थान उत्तर वैदिक काळाशी तुलना केली असता अधिक मानाचे होते. पंरतु तेव्हाही ते पुरुषांच्या बरोबरीचे नव्हतेच. स्थावर संपत्तीवर त्यांना अधिकार नव्हता. उत्तर बैदिक काळात स्त्रियांच्या सामाजिक दर्जा घसरत गेला. स्त्रिया फक्त घरगुती कर्तव्याशी बांधल्या गेल्या. स्त्रियांचा समाज व कुटुंबातील दर्जा गौण ठरला. कुटुंबपध्दती पितृप्रधान असणे आणि संपत्तीचा आणि वंशावळीचा वारसा हा पित्याकडून मूलाकडे जाणे ही पूर्वापार प्रथा आणखी खोलवर रुजली. त्यामुळे स्त्रियांनी जन्मापासून विवाहापर्यंत पित्याचा, विवाहापासून मृत्यूपर्यत पतीच्या माणि मूलाच्या आश्रित राहणे असा दंडक घातला गेला.

**मध्ययुगीन काळ :**

भारतातील मध्ययुगीन काळ हा परकीय आक्रमनाचा काळ होता. १६ व्या शतकात व्यापाराच्या उद्देशाने पोर्तुगीज भारतात आले. सतराव्या शतकाच्या पूर्वाधात डच आणि ब्रिटिशही भारताच्या किनाऱ्यावर उतरले. ब्रिटिशांच्या काळात प्रशासनामध्ये अनेक संस्थात्मक सुधारणा होऊन राज्यकारभाराची घडी सुरळीत झाली. तसेच अनेक सामाजिक सुधारणा होने शक्य झाले. शाळा आणि महाविद्यालयामध्ये सर्व वंश, जाती आणि धर्माच्या मुला-मुलींना प्रवेश घेण्याची मुभा होती.

**एकोणिसावे शतक :**

एकोणिसाव्या शतकामध्ये सामाजिक आणि धार्मिक सुधारनेच्या अनेक चळवळी उभ्या राहिल्या. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बेझंट, रामास्वामी पेरियार यांनी केलेल्या चळवळी नंतर सामाजिक सुधारणा फक्त चळवळीच्या माध्यमाने होणार नाही तर त्यासाठी कायदयाची शिक्षणाची आवश्यकता भासली. शिक्षणाचा संबंध सामाजिक सुधारणा तसेच भारतीय समाजात दुर्बल घटकाना संरक्षण देणे या गोष्टीशी होता.

**स्वातंत्रोत्तर काळ :**

स्वातंत्रोत्तर काळात भारताच्या ध्येयधोरणांमध्ये अनेक बदल झाले. आपली प्राचीन संस्कृती आणि ब्रिटिश काळ यांच्या सामिश्र् परिणामातून आपले विचार, वागणूक, उद्दिष्टे, ध्येये, गरजा या गोष्टी विशिष्ट प्रध्दतीने समोर येत आहेत. त्याबरोबर आपल्यापुढे नवीन आव्हाने उभे राहिलेले आहेत.

**बेटी बचाओ, बेटी पढाओ योजना :**

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेची घोषणा २२ जानेवारी २०१५ रोजी पानिपत, हरियाना येथे पंतप्रधानांनी केली. 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजना घटते बाल लिंग गुणोत्तर (CSR) आणि जीवन-चक्र निरंतरतेवर महिला सक्षमीकरणाशी संबंधित समस्याचे निराकरण करते. हा महिला आणि बाल विकास, आरोग्य आणि कुटुंब कल्याण आणि मानव संसाधन विकास मंत्रालयाचा त्रि-मंत्रालयीन प्रयत्न आहे.

योजनेच्या मुख्य घटकांमध्ये प्रसव पूर्व लिंगनिदान चाचणी कायदयाची अमलबजावणी, देशव्यापी जनजागृती आणि समर्थन मोहीम आणि पहिल्या टप्यात निवडक १०० जिल्ह्यामध्ये बहु-क्षेत्रीय कारवाई यांचा समावेश आहे. प्रशिक्षण, संवेदनशीलता, जागरुकता वाढवणे आणि जमिनीवर समुदाय एकत्रीकरण याद्वारे मानसिकता बदलण्यावर भर दिला जातो.

समाजाचा मुलीकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न एस.डी.ए. सरकार करीत आहे. पंतप्रधानांनी त्यांच्या मन की बातमध्ये हरियाणातील बीबीपूर येथील सरपंचाचे कौतुक केले. ज्यांनी सेल्फी विथ डॉटर उपक्रम सुरु केला. पंतप्रधानांनी लोकांना त्यांचे सेल्फी मुलींसोबत शेअर करण्याचे आवाहन केले आणि ते लवकरच जगभरात लोकप्रिय झाले. भारतातील आणि जगभरातील लोकांनी त्यांचे सेल्फी मुलीसोबत शेअर केले आणि ज्यांना मुली आहेत त्यांच्यासाठी हा अभिमानाचा प्रसंग ठरला.

'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजना लागू झाल्यापासून बहु-क्षेत्रीय जिल्हा कृती योजना जवळजवळ सर्व राज्यांमध्ये कार्यान्वित झाल्या आहेत. जिल्हा स्तरीय अधिकारी आणि आघाडीच्या कार्यकत्यांच्या क्षमता अधिक बळकट करण्यासाठी प्रशिक्षकांना क्षमता निर्मिती कार्यक्रम आणि प्रशिक्षण दिले गेले आहेत. एप्रिल - आक्टोबर, २०१५ या कालावधीत महिला आणि बाल विकास मंत्रालयाने सर्व राज्ये/केद्र शासित प्रदेशांना समाविष्ट करुन प्रशिक्षणांचे आयोजन केले आहे.

**“स्त्री भृणहत्या म्हणजे गर्भात असलेल्या नवजात मुलीची जाणीवपूर्वक केलेली हत्या होय":**

भारत देशात पुरुषप्रधान संस्कृती आणि पुरुषांचे वर्चस्व असलेला समाज अशा प्रकारची मानसिकता असलेल्या भारतीय समाजात मुलांच्या जन्माला प्राधान्य देऊन मुलीच्या जन्माल विरोध केला जातो. अशा वेळी स्त्रीच्या पोटातील गर्भाचे निदान करून तो गर्भ मुलीचा असल्यास लगेच गर्भपात करून त्याला जन्मापूर्वीच नष्ट केल्या जाते. म्हणूनच बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेच्या माध्यमातून लिंग निदानाला व भ्रूणहत्या आळा घालण्यात आलेला आहे.

शिक्षणातील असमानता गुंतागुंतीची आहे. स्त्रिया आणि मुलींना शाळेत प्रवेष करण्यासाठी अनेक अडथळ्यांना तोंड दयावे लागते. उदाहरणार्थ महिलावरील हिसांचार आणि मुलींना शिकविण्यास मनाई अशा अनेक समस्या आहेत. स्त्री शिक्षणाचा समाजावर होत असलेल्या अतिशय व्यापक परिणामामुळे महिलांचा शिक्षणातील असमानता दूर करणे आवश्यक आहे. स्त्रीच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण परिपोषण करणारे अतिशय महत्वाचे साधन म्हणजे समाजातील सर्व स्तरातील स्त्री शिक्षण होय. स्त्री शिक्षण हा कोणत्याही देशात समाजजीवनाच्या समृध्दीचा आणि देशाच्या प्रगतीचा मापदंड आहे. कोणत्याही देशातील समाजाची सांस्कृतिक पातळी ही त्या समाजातील स्त्रियांची परिस्थिती कशी आहे त्यावरून ठरविल्या जाते. यादृष्टीने भारत सरकारची 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजना महत्वपूर्ण ठरलेली आहे.

बेटी बचाओ बेटी पढ़ाओ योजनेचे महत्व - या योजनेमध्ये बाल लिंग गुणोत्तर कमी करणे आणि लिंग आधारित असमानता दूर करून मुलीचे संरक्षण करताना महिला सक्षमीकरण वाढवणे इत्यादी अनेक समस्याचे निराकरण करण्याचा प्रयत्न केला जातो.

**बेटी बचाओ बेटी पढाओ योजनेची उदिष्ट्ये :**

- देशातील नागरिकांची मानसिकता बदलतांना मुलींना भेडसावणारी समाजातील भेदभाव असलेल्या परिस्थितीचा सामना करने हा या योजनेचा उद्देश आहे.
- मुलीचे शिक्षण आणि सामाजिक सहभाग ही या योजनेची उहिष्टे आहे
- ही योजना संपूर्ण भारतीय मोहिमेद्वारे बाल लिंग गुणोतर समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करते.

**मुल्यमापन :**

भारत सरकारची बेटी पढाओ बेटी बचाओ योजनेचे उदिष्ट कमी होत चाललेले. बाल लिंग गुणोत्तर दूर करणे आणि मुलीच्या शिक्षणाला प्रोत्साहन देणे हे आहे. ही सदर योजना महिलांच्या शैक्षणिक विकासाला. पूरक ठरणारी आहे.

**संदर्भ :**

- पाटील एस. के. आणि इतर (१८८4) महाराष्ट्र सामाजिक व राजकीय विकास विदया बुक्स, औरंगाबाद
- कन्हाडे बी बी. एम. (२०११) सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र पिंपळ पिंपळापूर पिंपळापुरे अँड कं. पब्लिशर्स, नागपूर
- शिरसीकर व. म. (२००१) आधुनिक महाराष्ट्राचे राजकारण, फान्टीनेन्टल प्रकाशन, विजयानगर, शहनिदे, फ. म. शेतकरी, आंतरभारती प्रकाशन
- जैन अशोक (२०००) महाराष्ट्राचेशासन आणि राजकारण, मुंबई.